यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी क्र .(०२५३) २२३१४७५,२२३१७१४,२२३१७१५,फॅक्स क्र.२२३१४७५

# मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेच्या दि.२१ एप्रिल २०१७ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त

मानव्यविद्या व सामाजिशास्त्रे विद्याशाखा परिषदेची सभा शुक्रवार, दि. २१.०४.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सभेस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ.उमेश राजदेरकर, | अध्यक्ष |
| २) | डॉ.मनोज किल्लेदार | सदस्य |
| ३) | प्रा.प्रवीण घोडेस्वार, | सदस्य |
| ३) | प्रा. नागार्जून वाडेकर, | सदस्य |
| ५) | प्रा.राम ठाकर | सदस्य |

या सभेस पुढील सदस्य कार्यबाहुल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी तसे अगोदर कळविले होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ.तुकाराम पाटील, पुणे | सदस्य |
| २) | डॉ.नंदिनी दिवाण, मुंबई | सदस्य |
| ३) | डॉ.अशोक चौसाळकर, कोल्हापूर | सदस्य |
| ४) | डॉ.के.जी.रणवीर , औरंगाबाद | सदस्य |
| २) | डॉ.लक्ष्मीकांत देशमुख, पुणे | सदस्य |
| ३) | डॉ.मोहन खेरडे, अमरावती | सदस्य |
| ५) | प्रा.दादासाहेब मोरे, कोल्हापूर | सदस्य |
| ५) | डॉ.जयदीप निकम, य.च.म.मु.वि,नाशिक | सदस्य |
| ७) | डॉ.माधवी धारणकर, मुंबई | सदस्य |

प्रथमत: बैठकीच्या सुरुवातीला संचालकांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व बैठकीस प्रारंभ झाला.

या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०१**
मागील दि. २८.०३.२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे ( सहपत्र १)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०१**
मागील दि. २८.०३.२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०२**
मागील दि. २८.०३.२०१६ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तावरील कार्यवाहीचा अहवाल वाचून कायम करणे ( सहपत्र २)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०२**
मागील दि. २८.०३.२०१६ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तावरील कार्यवाहीचा अहवाल वाचून कायम करण्यात आला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०३**
बी.ए.(ऑनर्स) शिक्षणक्रम पुनर्रचना आणि एम.ए. विकसन यातील पुस्तक लेखन व संपादन यात सूसुत्रता नसल्याने बी.ए. (ऑनर्स) आणि एम.ए.पुस्तकांविषयी पुनर्विचार करणे.
(टिपणी : विद्याशाखेत बी.ए.(ऑनर्स) हे काम हाती घेण्यात आलेले होते. मात्र शिक्षणक्रम विकसनासाठी अध्यारूत असलेल्या विकसन प्रणालीचा अवलंब करण्यात आलेला नव्हता. जसे अ, ब, क प्रपत्र तयार करणे व संबंधीत वैधानिक मंडळांची मंजूरी उदा.जसे विद्वत परिषद इत्यादी.

शिक्षणक्रम विकसनासाठी अत्यावश्यक असणारा विकसन काळ अध्ययन साहित्य लेखन करणाऱ्या तज्ज्ञांना देण्यात आला नाही तसेच आशय संपादकांना काटेकोरपणे पुस्तकांचे आशय संपादन करण्यास आवश्यक त्या सूचना व कालावधी देखील देण्यात आला नाही. परिणामी लेखन पूर्ण होऊन प्राप्त आलेली पुस्तकेही अत्यंत त्रोटक, आशयात्मक सुधारणा करण्यास वाव असणारी आणि स्वयं-अध्ययन पद्धतीचे प्रारूप यांचा समावेश नसलेली अशी आहेत. या पुस्तकांवर श्रेयांकानुसार आशयात वाढ करण्याची आणि अनुदेशन संपादन प्रक्रिया करण्याची आवश्यकता आहे.

एम.ए. शिक्षणक्रमांचे केवळ प्रथम वर्षाचाच अभ्यासक्रम त्यातील काही पुस्तके वरीलप्रमाणे प्राप्त झालेली असून तज्ज्ञांच्या सहाय्याने पुस्तकात सुधारणा घडवून आणण्याचे आणि द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम तयार करण्याचे काम हाती घेतलेले आहे.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०३**
वरील विषयासंदर्भातील सविस्तर चर्चा होऊन शिक्षणक्रमाची पुस्तके विद्यापीठाच्या स्वयं-अध्ययन पद्धतीनुसार असावी. परिपूर्ण आशयानुसारच तयार करण्यात यावीत, अशी सूचना सभासदांनी केली. ज्या पुस्तकांच्या आशयात भर घालण्याची गरज आहे, त्या संदर्भातील कार्यवाहीदेखील लेखक व संपादांकाची बैठक आयोजित करून पूर्ण करावी. दर्जेदार अध्ययन साहित्य तयार झाल्यानंतरच शिक्षणक्रम घोषीत करावा, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.तसेच एम.ए. शिक्षणक्र माकरीता एका अभ्यासकेंद्रावर कमाल किती विद्यार्थी असावेत याचा निर्णय त्या संबधीत अभ्यासकेंद्रावर उपलब्ध असणाऱ्या साधन सुविधा व मनुष्यबळाची उपलब्धता विचारात घेऊन विद्याशाखा व विद्यार्थी सेवा विभाग यांनी संयुक्तपणे घ्यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०४**
वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका परत सुरू करण्याबाबत...
(टिपणी : विद्यापीठ अनुदान आयोगाने दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण देणाऱ्या राज्यस्तरीय विद्यापीठांना त्यांच्या पातळीवर प्रमाणपत्र व पदविका पातळीवरील शिक्षणक्रम सुरू करण्यास संमती दिली आहे. विद्याशाखेने वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका हा शिक्षणक्रम कार्यान्वीत केला होता. तसेच यास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. यास्तव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वरील निर्णयानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र दि. १६ डिसेंबर २०१६ जावक क्र. F.NO.२-१०/२०१६ (DEB) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका परत सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०४**

वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका शिक्षणक्रम २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून परत सुरू करण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०५**

अभ्यासकेंद्र पाहणी करण्याबाबत...

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन पद्धतीने मान्यता देण्यात आलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करणे व पुरेशा शैक्षणिक व प्रशासकीय सेवा देऊ न शकणाऱ्या केंद्राबाबत निर्णय घेणे.

(टिपणी : विद्याशाखेने २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन पद्धतीने अभ्यासक्रमांना मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार एम.ए. (मराठी/हिन्दी/इंग्रजी) या शिक्षणक्रमांची अभ्यासकेद्रे निश्चित करण्यात आली. परंतु असे आढळून आले आहे की, बऱ्याच अभ्यासकेंद्रांकडे आवश्यक त्या शैक्षणिक व प्रशासकीय सुविधा उपलब्ध नाहीत. परिणामी विद्यार्थी शैक्षणिक सुविधापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अभ्यासकेंद्रांची प्रत्यक्ष पहाणी करण्याचे आणि आवश्यक त्या सोयी सुविधांचा अभाव असलेल्या अभ्यासकेंद्राच्या मान्यतेबद्दल पुनर्विचार करण्याची प्रक्रिया विद्याशाखेने सुरू केलेली आहे. त्याप्रमाणे याच प्रक्रियेचा भाग म्हणून मुंबई, नागपूर आणि नांदेड येथे विद्याशाखेतील शिक्षकांनी विभागीय केंद्रावर प्रशिक्षण आणि पाहणी दौऱ्याचे आयोजन केले होते. नागपूर विभागातील सहा अभ्यासकेंद्रे बंद करण्याची शिफारस समितीने केलेली आहे.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०५**

ऑनलाईन पद्धतीने एम.ए. शिक्षणक्रमांची अभ्यासकेंद्रे देण्यात आली. परंतु काही केंद्राबाबत शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांबाबत अनेक प्रश्न आहेत. त्याकरीता विद्याशाखेने विभागनिहाय अभ्यासकेंद्रांची तपासणी करून जी अभ्यासकेंद्रे विद्यार्थ्यांना प्रवेश शैक्षणिक व प्रशासकिय सुविधा देऊ शकत नाहीत. अशी अभ्यासकेंद्रे बंद करण्याचा निर्णय घेतला. विद्याशाखा परिषदेने या कामास प्राधान्य देऊन व अधिक गतीमान करून विद्यार्थाना गुणवत्तापूर्वक सुविधा कशा मिळतील याकडे काटेकोरपणे लक्ष देण्याची सूचना केली आणि या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०६**

एम.एस.डब्ल्यु.शिक्षणक्र माच्या विकसनाबाबत.

(टिपणी : विद्याशाखेने एम.ए. शिक्षणक्रमांसोबतच एम.एस.डब्ल्यू. शिक्षणक्रम विकसनांचे काम हाती घेतले होते. तथापी अन्य शिक्षणक्रमाप्रमाणेच याही शिक्षणक्रमासाठी अध्यारूत असलेली विकसन प्रणालीचा अवलंब करण्यात आलेला नाही. तसेच संबधीत प्रपत्रे (अ/ब/क) तयार करण्यात आलेली नाहीत. एम.एस.डब्ल्यू. हा व्यावसायीक शिक्षणक्रम असल्याने या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य आणि प्रात्यक्षिक कार्य इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली आणि पारंपारीक विद्यापीठातील समाजकार्य शिक्षणक्रमाचा अभ्यासक्रम गुणात्मकदृष्ट्या समकक्ष असणे आवश्यक आहे. या शिक्षणक्रमाची लिहून प्राप्त झालेली पुस्तके या दृष्टीने परिपूर्ण नाहीत. यास्तव या पुस्तकांचे आशयात्मकदृष्ट्या परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात निर्णय घेणे.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०६**

वरील विषयासंदर्भातील सविस्तर चर्चा होऊन शिक्षणक्रमाची पुस्तके विद्यापीठाच्या स्वयं-अध्ययन पद्धतीनुसार असावी. परिपूर्ण आशयानुसारच तयार करण्यात यावीत, अशी सूचना सभासदांनी केली. ज्या पुस्तकांच्या आशयात भर घालण्याची गरज आहे. त्या संदर्भातील कार्यवाहीदेखील लेखक व संपादकाची बैठक आयोजित करून पूर्ण करावी. दर्जेदार अध्ययन साहित्य तयार झाल्यानंतरच शिक्षणक्रम घोषीत करावा, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०७**

शिक्षणकम मुल्यमापन आराखडा स्वरूपाबाबत चर्चा करणे

(टिपणी : विद्याशाखेतील सर्व शिक्षणकमांकरिता केवळ लघूत्तरी प्रश्न असणारा मूल्यमापन आराखडा स्वीकृत करण्यात आलेला आहे. वास्तविक विद्याशाखेने समंत केलेल्या शिक्षणकमनिहाय मूल्यमापन आराखड्याचे लघुत्तरी प्रश्न, दिर्घोत्तरी प्रश्न आणि वस्तुनिष्ठ प्रश्न यांचा समावेश होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान व्यक्त करण्याची पुरेपुर संधी व स्वातंत्र्य होते. परंतु सरसकट ५ गुणांच्या प्रश्नांसाठी विद्यार्थ्यांना आपले ज्ञान वेळ व शब्दमर्यादेमुळे व्यक्त करता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन होत नाही. याबाबत चर्चा करणे.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०७**

या विषयी सविस्तर चर्चा होऊन विद्याशाखेने मूल्यमापन आणि परीक्षा विभाग यांच्याशी संवाद साधून आवश्यक उपयुक्त असा मूल्यमापन आराखडा स्वीकारावा मात्र विद्याशाखेची भूमिका मान्य करून पुढील कार्यवाहीबद्दलचे निर्देश दिले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०८**

ज्ञानगंगोत्री लेखक मानधन व वर्गणीबाबत.

(टिपणी :ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णांत शिक्षणकमाच्या `वर्तमान घटना व घडामोडी (LIB ००३)` या अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य म्हणून `ज्ञानगंगोत्री` हे त्रैमासिक प्रकाशित करण्यात येते. या त्रैमासिकात या अभ्यासक्रमाशी निगडीत विविध घटकांवर अभ्यासपूर्ण लेख या क्षेत्रातील तज्ञांकडून लिहून घेतले जातात, तसेच संशोधनावर आधारित निबंधही प्रकाशित करण्यात येतात. यावर विद्यार्थ्याचे अंतर्गत व अंतिम मूल्यमापन करण्यात येते.

सध्या या त्रैमासिकात प्रकाशित होणाऱ्या लेखांसाठी रू. ५००/- एवढे मानधन देण्यात येत आहे. ज्ञानगंगोत्रीच्या संपादक मंडळाची बैठक दि. २८ जानेवारी २०१७ रोजी संपन्न झाली. या बैठकीत सदर मानधनात वाढ करून ते रू. १०००/- (एक हजार फक्त) करण्यात यावे अशी विनंती करण्यात आली. त्याचप्रमाणे लेखाच्या Peer review साठी देखील रू. १०००/- एवढे मानधन सर्वानुमते ठरवले. तसेच विशेषांकाच्या जबाबदारी अतिथी संपादकांना रू. ५,०००/- एवढे मानधन देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०१७-१८) ज्ञानगंगोत्रीच्या वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले संस्थेकरीता - रू. १,२००/- आणि व्यक्तीकरीता - रू. ६००/- यामुळे सदर मानधात वाढ करण्याबाबत निर्णय घेणे.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०८**

येत्या शैक्षणिक वर्षापासून ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकासाठी लेख लिहिणाऱ्या लेखकांना यापुढे रू. १०००/- मानधन देण्यात यावे. तसेच ज्ञानगंगोत्रीच्या वर्गणीचे दर संस्थेसाठी रू.१,२००/- आणि व्यक्तीकरीता रू. ६००/- सर्वानुमते निश्चित करण्यात आले. तसेच `ज्ञानगंगोत्री` या त्रैमासिकाच्या संपादक पदाची जबाबदारी या क्षेत्रातील बाहेरील तज्ज्ञाकडे देण्याचा आणि प्रति अंक रू. ५०००/- + रू. २०००/- लेखाची संगणकीय प्रत तयार करणे व अनुषंगीक खर्च = एकूण रू. ७०००/- एवढे मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०९**

बी.ए. द्वितीय व तृतीय वर्षाच्या इंग्रजी विषयाची पुस्तके अधिक अध्ययन म्हणून बाजारातून खरेदी करून ती विद्यार्थ्यांना पुरविण्याबाबतचा निर्णय कार्योत्तर मंजुरीसाठी

(टिपणी : बी.ए.शिक्षणक्रमाच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अध्यनासाठी असणाऱ्या ENG २१५ How to Read a Novel आणि ENG २५६ Understanding Drama या दोन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या अध्ययनसाहित्याबरोबरच १) The Guide (RK Narayan) २) The Old Man and the sea (Earnest Hemigway) ३) Tughalg (Girish Karnad) ४) Julius Gaesar (William Shakespeare) ही पुस्तके अधिक अध्ययनासाठी बाजारातून विकत घेऊन पुरविण्यात आली होती. परंतू या पुस्तकांचा प्रत्यक्ष वापर, समंत्रकांकडून विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाविषयीची प्रेरणा याबाबत मोठ्या प्रमाणात साशंकता होती. आणि अनेक विद्यार्थ्यांनी ही पुस्तके प्राप्त असून देखील वाचलेली नव्हती. यावर विद्याशाखा प्रतिवर्षी सुमारे ३० लाख एवढा खर्च करीत असे. अध्ययनाचा मुख्य भर विद्यापीठाने पुरविलेल्याच पुस्तकांवर असल्याने ही पुस्तके खरेदी करून विद्यार्थ्यांना पुरविण्याऐवजी अभ्यासकेंद्रात उपलब्ध असलेल्या प्रती त्यांना वाचनासाठी उपलब्ध करून द्याव्यात. विद्यापीठाने ही पुस्तके बाजारातून खरेदी करून विद्यार्थ्यांना पुरविण्यात येऊ नयेत असा निर्णय घेण्यात आला. सदर विषय कार्योत्तर मंजूरीसाठी सादर.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/०९**

बी.ए. द्वितीय व तृतीय वर्षाच्या इंग्रजी विषयाची पुस्तके अधिक अध्ययन म्हणून बाजारातून खरेदी करण्यात येऊ नयेत सध्या अभ्यासकेंद्राकडे असलेली पुस्तकेच वाचनासाठी उपलब्ध करून द्यावीत या निर्णयास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/१०**

बहाई ॲकॅडमीच्या प्रस्तावाबाबत...

(टिपणी : पाचगणी (जि.सातारा) येथील बहाई ॲकॅडमी या संस्थेने जागतिक मानवी मूल्ये (Univers of Human Values) आणि विद्यार्थ्यांच्या परिवर्तनासाठी नेतृत्व (Leadership for change for students) असे दोन शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत पत्र पाठवून विनंती केली आहे. यासंदर्भात निर्णय घेणे)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/१०**

पाचगणी (जि.सातारा) येथील बहाई ॲकॅडमी या संस्थेने जागतिक मानवी मूल्ये (Univers of Human Values) आणि विद्यार्थ्यांच्या परिवर्तनासाठी नेतृत्व (Leadership for change for students) असे दोन शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी विद्याशाखेचे प्रतिनिधी संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचेशी चर्चा करतील. असा ठराव सर्वानुमते करण्यात आला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/११**

प्रहार विद्यार्थी संघटनेने मागणी केलेली आहे की, आपल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत अभ्यासक्रमांचे मराठीत असलेले नाव इंग्रजीत भाषांतरीत करून द्विभाषीय स्वरूपात (bilingual) करण्यात यावीत अशी मागणी केलेली आहे. याबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/११**

विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत अभ्यासक्रमांचे मराठीत असलेले नाव इंग्रजीत भाषांतरीत करून द्विभाषीय स्वरूपात (bilingual) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/१२**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळीस येणारा विषय

एम.ए.नवीन अभ्यासकेंद्र मागणी करणाऱ्या संस्थांचे प्रक्रिया शुल्क परत करण्याबाबत

(टिपणी : विद्याशाखेमार्फत नविन सुरू होणाऱ्या शिक्षणक्रमांकरीता काही संस्थांनी अभ्यासकेंद्र मागणी अर्ज व प्रक्रिया शुल्क जमा केलेले आहे. त्यातील काही संस्थांनी त्यांचे प्रक्रिया शुल्काची मागणी केलेली आहे.)

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१७/१२**

एम.ए.नवीन अभ्यासकेंद्र मागणी करणाऱ्या संस्थांचे प्रक्रिया शुल्क परत करण्याबाबत

विद्याशाखेमार्फत नविन सुरू होणाऱ्या शिक्षणक्रमांकरीता काही संस्थांनी अभ्यासकेंद्र मागणी अर्ज व प्रक्रिया शुल्क जमा केलेले आहे. परंतु संबधित एम.ए.शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य तयार नसल्याने व साहित्य तयार झाल्याशिवाय शिक्षणकम सुरू होणार नसल्याने ज्या संस्थांनी प्रक्रिया शुल्काची मागणी केलेली आहे त्यांना ते परत करण्यात यावे. तसेच जे शिक्षणकम सुरू होणार नाहीत याची माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

सभेच्या शेवटी प्रा. प्रवीण घोडेस्वार यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले बैठकीचे कामकाज संपले.

आपला,

( डॉ.उमेश राजदेरकर )

संचालक

मानव्यविद्या व सा.शास्त्रे विद्याशाखा

Vayunandan 15/5

कुलगुरू

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक - ४२२ २२२